# Report of the Expert Committee for Environmental Improvement of Airoli Creek at Navi Mumbai

ऐरोली येथील खाडी आणी काठावरील परिसराचे प्रदूषण निवारण व सुशोभीकरण समिती

# अहवाल

MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**July, 2005**

महाराष्ट्र विधानसभा

विधान सभा
महाराष्ट्र

**Gajanan Kirtikar**

- Member of Legislative Assembly
- Chief Whip
  Shiv Sena Legislative Party

4 FEB 2005

1297
712
712

2232
05/02/05

मा. श्री.दि. भा. बोराळकर
सदस्य सचिव
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
कल्पतरू पॉईंट, सायन सर्कल,
सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२

महोदय,

विषय : नवी मुंबई, ऐरोली येथीह खाडी आणि खाडीच्या काठावरचा परिसर प्रदूषण मुक्त करून हा भाग संरक्षित करावा यासंबंधी

नवी मुंबई, ऐरोली, सेक्टर १४, १५ आणि १७ समोर पसरलेल्या खाडीच्या परिसराचे नैसर्गिक सुशोभिकरण करून तेथील दुर्मिळ दुर्लक्षित पक्षी वसाहत वाचविण्यासाठी मी नवी मुंबई महानगरपालिकेशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती या पत्रासोबत पाठवित आहे. सदर पत्र व्यवहार स्वयंस्पष्ट आहे. दुर्दैवाने नवी मुंबई महानगरपालिकेने या परिसराच्या नैसर्गिक सुशोभिकरणासाठी अद्याप कोणतीही उपाय योजना केलेली नाही.

या खाडी व खाडीलगतच्या परिसराचे नैसर्गिक सुशोभिकरणाचे काम नवी मुंबई महानगरपालिकेने सत्वर सुरू करावे म्हणून जल (प्रदूषण नियंत्रण आणि प्रतिबंध) कायदा, १९७४ तसेच पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत तरतूदी नुसार नवी मुंबई महानगरपालिके विरूध्द महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने तातडीने कायदेशीर कारवाई करावी. त्याच प्रमाणे खाडीच्या काठावरील भूभागावर कोणतेही बांधकाम (उदा. शौचालय, मुतारी इत्यादी) करण्यास नवी मुंबई महापालिकेला मनाई करावी आणि खाडी व खाडीच्या काठावरचा भूभाग संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करावा, ही विनंती.

Ro-PSP

आपला विश्वासू,

सोबत : वरीलप्रमाणे

2, Snehdeep, Aarey Road, Goregaon (E), Mumbai - 400 063. Tel. : (R) 8730362 (O) 8730262

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई**

जा.क्र.मप्रनि/ ९६१
कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला,
सायन-माटुंगा स्किम रोड क्र.८,
सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व)
मुंबई- ४०० ०२२.

दिनांक: २५/२/२००५.

**कार्यालयीन आदेश क्रमांक ६७८ /२००५**

विषय: नवी मुंबई, ऐरोली येथील खाडी आणि खाडीच्या काठावरील परिसर प्रदूषणमुक्त करुन हा भाग संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत तसेच मा. आमदार श्री.गजानन किर्तीकर यांच्या-कडून प्राप्त झालेले प्रस्ताव/सूचनांची तपासणी करण्याकरिता तज्ञ समिती गठीत करण्याबाबत

संदर्भ: १. मा. सदस्य सचिव, म. प्र. नि. मंडळ, मुंबई यांचे दिनांक ०५/०२/२००५ चे आदेश
२. उप-प्रादेशिक अधिकारी, मुंबई यांचे पत्र क्रमांक मप्रनि/तांशा/ब-६६६, दिनांक १०/०२/२००५

नवी मुंबई, ऐरोली येथील खाडी आणि खाडीच्या काठावरील परिसर प्रदूषणमुक्त करुन हा भाग संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करावा, याबाबत व या संदर्भात मा. आमदार श्री.गजानन किर्तीकर यांच्याकडून आलेले प्रस्ताव/सूचना व त्यावर कृती आराखडा बनविण्यासाठी खालील तज्ञांची समिती गठीत करण्यात आली.

१. डॉ. एस. बी. चापेकर, इकॉलॉजिस्ट
२. श्री. किशोर धारिया, पर्यावरण तज्ञ, हिरवळ प्रतिष्ठान, महाड, जि. रायगड
३. डॉ. अ. रा. सुपाते, प्रकल्प प्रमुख, झोनिंग ॲटलास प्रकल्प, रायगडभवन
४. श्री.सु. सं. डोके, प्रादेशिक अधिकारी (प्रकल्प व योजना ), मुख्यालय
५. श्री.अ. भि. जैन, वरिष्ठ विधी अधिकारी
६. श्री.हेमंत राणे, पर्यावरण तज्ञ
७. श्री.दि. मा. चौखंडे, प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई

सदर तज्ञांच्या समितीने करावयाची कामे

१. मा.आमदार श्री.गजानन किर्तीकर यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव/सूचना यांची तपासणी..

२. सदरहू खाडी भागाची पाहणी व सर्वेक्षण

३. त्या अनुषंगाने कृती आराखडा बनविणे

सदर कामाकरिता अशासकीय सदस्यांना प्रतीदिन रु. १५००/- मानधन याप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे देण्यात येईल. समितीचा कार्यकाल आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्यापर्यंत लागू राहील.

( दि. भा. बोराळकर )
सदस्य सचिव

प्रति,
१. डॉ. एस. बी. चाफेकर
२. श्री. किशोर धारिया
३. डॉ. अ. रा. सुपाते, प्रकल्प प्रमुख, झोनिंग ॲटलास प्रकल्प, रायगडभवन
४. श्री.सु. सं. डोके, प्रादेशिक अधिकारी (प्रकल्प व योजना ), मुख्यालय
५. श्री.अ. भि. जैन, वरिष्ठ विधी अधिकारी
६. श्री.हेमंत राणे
७. श्री.दि. मा. चौखंडे, प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई
प्रत माहितीसाठी रवाना-
सर्व संबंधीत अधिकारी

# Annexures



MAHARASHTRA

# CONTENTS


| Sr. No. | Subject | Page No. |
| --- | --- | --- |
| 1 | Genesis of the Committee | 1 |
| 2 | Terms of Reference | 1 |
| 3 | Method of Work | 2 |
| 4 | Deliberations | 2 |
| 5 | Observations & Recommendations | 11 |
| 6 | Executive Summary | 17 |
| 7 | Action Plan | 21 |
| | **Maps**<br>1 Location of Navi Mumbai<br>2 Navi Mumbai showing location of Airoli<br>3 The study area | |
| | **Annexure**<br>I. Letter from Hon'ble Shri Gajanan Kirtikar, MLA<br>II. Office Order | |

# Report Of The Expert Committee For Environmental Improvement Of Airoli Creek At Navi Mumbai

## ऐरोली येथील खाडी आणी काठावरील परिसराचे प्रदूषण निवारण व सुशोभीकरण समिती

## अहवाल



MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

July, 2005

# Executive Summary